# ग्रामीण साहित्य प्रवाह

डॉ. प्रीती किशोर उमाठे
मराठी विभाग प्रमुख
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज नागपुर
मो. न. 9764032422
e-mail – priteeumathe@gmail.com

1960 नंतर मराठी साहित्यात जे अनेक प्रवाह निर्माण झाले त्यात ग्रामीण साहित्य एक महत्वाचे आणि मैलाचा दगड ठरणारे साहित्य मानले जाते. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. जिल्हा परिषदा, तालुका, पंचायत समित्या अस्तित्वात आल्या. ग्रामस्वराज्यापासुन आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण माणसाने सप्तरंगी स्वप्न साकार होणार म्हणुन ग्रामीण भागातील तरुणांना अतिशय दिलासादायक वाटल. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये उघडू लागली. कसेबसे मोजकेच शिक्षण घेणारे तरुण शिक्षण घेऊ लागले. ग्रामीण साहित्याविषयी लिहू लागले ही सारी परिस्थिती राज्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक बदल होण्यास सुरुवात झाली आणि खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याला सुरुवात झाली. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या अतिशय मोलाची भर घातली आहे. एक नवा आशय, ग्रामीण जीवनातील रुढी, परंपरा, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक जीवनाचे नवे क्षेत्र मराठी वाचकांसाठी ग्रामीण साहीत्यीकांनी खुले करुन दिले. एका अर्थाने मराठी साहित्याला समृध्द करण्याचे कार्य साहीत्याने केले. मराठी ग्रामीण साहीत्याबाबात नेहमीच असे सांगीतले जाते की 1920 नंतर त्याचा खरा प्रसार सुरु झाला. महात्मा गांधीचे "भारत हा खेडयाचा देश आहे." हे विधान त्यामागे आहे त्यांच्या वेळेपर्यंत भारतीय राजकारण व समाजकारण हे प्रामुख्याने शहरांच्या नागरी परीघातच फिरणारे होते त्यामुळे या क्षेत्रातील जागृतीही तशी नागर समाजापुरतीच मर्यादीत होती. त्याचा परीणाम म्हणून त्या काळातील साहीत्याचे कुतूहल विषयही नागरी जीवनाशी संबधीत होते. महात्मा गांधीच्या विधानाचा ग्रामीण लेखकांवर गंभीर परीणाम झाला किंवा असे म्हणता येईल की, 'ग्रामीण अनुभुतिची कलात्मक जाणीव त्यांना झालेली होती ग्रामीण साहीत्य मराठीत निर्माण होऊ लागले इतकेच नव्हे तर त्याला "ग्रामीण साहीत्य" अशी स्वतंत्र्य दखलवजा संज्ञाही प्राप्त झाली.

1960 नंतरच्या काळात मराठी वाङ्मयीन क्षेत्रात ज्या विविध चळवळी उदयाला आल्या त्यात ग्रामीण व्यथा, वेदना, संवेदना, सुखदुःखे त्यांचे भावविश्व यांसारख्या सर्वच बाबी चित्रित करणाऱ्या ग्रामीण साहीत्याची वाटचाल महत्वाची ठरते. साठ नंतरच्या काळात जसजसे शिक्षण खेडयापाडयात गेले तसेतसे त्यातून ग्रामीण साहीत्याचे हे पीक जोमाने बहरले 1975 च्या आसपास ग्रामीण साहीत्य निर्मीतीला सुरुवात झाली त्यात आनंद यादव, नागनाथ कोतापल्ले, भास्कर चंदनशिव, द.ता. भोसले, वासुदेव मुलाटे, श्रीकांत देशमुख इ. अनेक लेखकांनी ग्रामीण साहीत्य निर्मितीसाठी मोलाचे योगदान दिले. यादृष्टीने

ग्रामीण साहीत्य आणि ग्रामीण समाज याचा ऋणानुबंध गृहीत धरून ग्रामीण साहीत्याच्या वाटचालीचा विचार करता येईल.

### ग्रामीण साहित्याची संकल्पना :–

'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना समजुन घेत असतांना आधी ग्रामीण ही संकल्पना समजुन घ्यावी लागते. ग्रामीण या शब्दातून ग्राम–गाव, खेडे इत्यादी गोष्टी लक्षात येतात. ग्राम– गाव किंवा खेडे यांची रचना त्यांचे स्वरुप– वैशिष्ट्ये समजुन घेतल्यास 'ग्रामीण साहित्ये' ही संकल्पना स्पष्ट होऊ शकते.

अलीकडे ग्रामीण जीवनात अनेक परिवर्तन घडुन आलेली आहेत. त्याआधी गाव हे गावगाडयावर आधारलेले होते. या गावगाडयात शेतकरी, अलुतेदार, बलुतेदार दलित इत्यादींचा समावेश होता. हे सर्व घटक गावपातळीवर एकमेकांशी निगडीत व परस्परांवर अवलंबुन होते. शेती हा खेडयातील मुख्य व्यवसाय उत्पन्नाचे मुख्य साधन, शेती करणारा शेतकरी , त्याला शेती व गृहपयोगी वस्तु व अवजारे करुण देणारे सूतार, लोहार, चांभार, कुंभार, तेली, सोनार इ. जाती या सर्वांना ग्रामजीवनात अतिशय महत्वाचे स्थान होते. अशाप्रकारे गामीण म्हणजे गावातील सर्व घटक त्यांच्या जगण्याची पद्धत रुढी परंपरा, लोकश्रद्धा, शेतीला काळी आई मानणे यातुनच सण, उत्सव, जत्रा, नवस, लग्नसमारंभ समुहाची जातीमध्ये विभागणी स्पृश्य– अस्पृश्यता पाळणे तरीही परस्परावलंबित्व इत्यादी वैशिष्ट्ये आहेत. ग्रामीण संकल्पनेमध्ये शेती, विहीरी, नद्या–नाले, झाडेझुडपे विविध पिके या सर्व घटकांना महत्व आहेच.

अशा या ग्रामीण जीवनात बदलत्या काळानुसार विविध परिवर्तने घडुन आली. स्वातंत्र्योत्तर काळात बलुतेदारी व्यवस्था मागे पडली. लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार शिक्षणाचा प्रचार प्रसार, यंत्रयुगाचे आगमन झाले. यंत्रयुग व औदयोगिकिकरण यामुळे ग्रामपातळीवरील व्यायवसायीक, बलुतेदारांचे धंदे डबघाईला आले. बेरोजगारी वाढली. दुष्काळामुळे शेतीत पिकेनासे झाले. दारीद्रय कर्जबाजारीपणा वाढला. खेडयातुन शहराकडे स्थलांतर होऊ लागले. पुढे जागतिकीकरणा नंतर या दुखःस्थितीला अधीक गती मिळाली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झाल्या त्या वाढत्या खेडयातील लोकांना आपले शोषण होत आहे हे लक्षात आले. त्याला जबाबदार असलेल्या घटकांचा ते भोध घेऊ लागले. त्याचा मनातही संघर्शाची, विद्रोहीची भावना निर्मान होऊ लागली त्यातुनच शेतकरी संघटना, त्यांचे लढे, अलिकडे शहरांच्या धान्य–दुध, भाजीपाला इत्यादींचा पुरवठा बंद करणे इथपर्यंत हा संघर्श येऊन पोहोचला आहे.

### "ग्रामीण साहित्यावरील व्याख्या" :–

1) "ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रीत तर असतेच पण त्या व्यक्तीमनाच्या जडणघडणीस कृशिकेंद्रीत संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा किंवा तत्सम कृषीपयोगी समाजरचना इत्यादी घटक जबाबदार असल्याने या व्यक्तीमत्वला केंद्रस्थानी

ठेऊन लिहीत असतांना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनित होत जातात त्यातुनच ग्रामीण साहित्य आकार घेत जाते." (नागनाथ कोतापल्ले)

2) ग्रामीण जीवनाचे, परीवर्तनाचे, संघर्शाचे चित्रण ज्या साहित्यातुन घडते ते ग्रामीण साहित्य होय. (श्रीराम गुंदेकर)

3) "ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे आणि ग्रामीण संवेदनशीलता ज्या लेखनातुन प्रत्ययाला येत असेल ते अस्सल ग्रामीण साहीत्य होय. (गो. मा. पवार)

4) "संकुचित ......... अर्थाने 'ग्रामीण साहित्य' या शब्दप्रयोगातील 'ग्रामीण' हा शब्द वापरलेला नाही. ते ग्रामीण व्यवस्थेशी एकुनच भारतीयांच्या ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. या समाजव्यवस्थेत ब्राम्हणांपासून ते अस्पृश्य आदीवासी पर्यंतची सर्व जाती–जमातीची समाजरचना अभिप्रेत आहे. ग्राम व ग्रामाच्या लगत बाहेर राहणारे अस्पृश्य तसेच रानावणात राहणारे आदिवासी भारतीय आणि त्यांचे जिवन हेही ग्रामीण या विशेषणाला अभिप्रेत आहे. या सर्वांची संवेदना ज्यात व्यक्त होते ते ग्रामीण साहित्य असा "ग्रामिण साहित्य" या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे. (आनंद यादव)

**ग्रामीण साहित्यातील प्रेरणा :–**

ग्रामीण साहित्याचा विचार करतांना त्या साहित्य प्रवाहात व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरुप पाहणे आवश्यक असते. ग्रामीण भागातील शिकलेल्या पिढीत 1960 च्या सुमारास सांस्कृतिक भान आले. आपण अनुभवलेले खेडे आणि जीवन साहित्यांचा विषय होऊ शकतो. आपण वाचतो ते प्रस्थापीत मराठी साहित्य समग्र मराठी जीवनाचे चित्रण करीत नाही. तर त्यात सर्वच घटकांचे चित्रण आलेले असते. खर तर खेडयात राहणारी माणसे आणि शेती, निसर्ग, पशुधन, ऋतुचक्र, पिके, जमिनीचा प्रकार यांचा अतुट संबंध असतो. त्यांचे सण, उत्सव, जत्रा, पुजा, विधी, रीतिरिवाज, आहार, पाहुणचार, वेशभुशा यांचा वरील घटकांशी अतुट संबंध असतो. ग्रामीण माणसांचे त्यांच्या काळयाआईवरील, पिकांवरील, झाडावरील, पशुधनावरील घनिष्ठ प्रेम असते यांचा बारकाण्याने शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्य –**

ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली आणि ग्रामीण साहित्यीक आत्मभान येऊन लिहू लागला ग्रामीण जीवनाकडे पाहू लागला. खेडी, खेडयातील निसर्ग, अनेक प्रकारचे प्रश्न कृषीजीवन अभावाचे जगणे ग्रामीण साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न होऊ लागला. या चळवळीमुळे साहित्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण होऊ लागले. या चळवळीमुळे महात्मा फुले यांच्या विचारांशी त्यांच्या साहित्याशी नाते जोडले गेले तर ग्रामीण साहित्याची चळवळ ही महात्मा फुल्यांच्या मानवतावादाचा, शुद्रातिशूद्रावर व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा छोटे शेतकरी, कुळे, कुणबी, शेतमजूर, खेडयातून नागर विभागात पोटार्थी म्हणून आलेले मजुर कामगार, दलित यांच्या होणाऱ्या शोषणाचा वारसा सांगते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. गांधी, कर्मवीर शिंदे यांचे विचारही ग्रामीण साहीत्य चळवळीचे अधिष्ठान होते असे म्हणता येईल. व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, अण्णाभाऊसाठे, शंकरराव खरात यांनीही वास्तव जीवन मराठी ग्रामीण साहित्यातून मांडले.

भारत स्वतंत्र्य झाला आणि गावगाडा मोडला गेला. गावगाडयामध्ये जीतीनिहाय व्यवस्था होती. प्रत्येक समाजगहाचा माणूस वेगळा असून त्याच्यामध्ये एकीची भावना होती. गावात प्रसंग, उत्सत्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येत असत आज परिस्थिती बदलली आहे आज साहित्याचा नायकही बदलला आहे. तो कष्टकरी झाला हा बदल 1945 नंतर झालेला दिसतो 1960–70 च्या सुमारास साहित्याने कात टाकली. नवी पीढी नव्या दृष्टीने जीवनाकडे बघायला लागली शिक्षणाचा प्रसार खेडयापाडयापर्यंत झाला जो वर्ग शाळेत जात नव्हता. तोही शाळेत जायला लागला. दळणवळणाच्या माध्यमाने खेडी शहराला जोडली गेली. स्वातंत्र्य मिळाले तरी अनेक प्रश्न अजून सुटले नाहीत याची जाणीव लेखकाला झाली. रा. र. बोराडे यांनी 'पाचोळा' कांदबरीतून खेडयातला एक घटक कसा उध्वस्त होतो. याचे चित्रण केले. 'धग' या कांदबरीतून उध्दव शेळके यांनी कपटकरी वर्गातील स्त्रीचे दुःख मांडले. धरणग्रस्ताचे प्रश्न, पाण्याचा प्रश्न साहित्यांचे विषय झाले.

नागनाथ कोत्तापल्ले यांची गांधारी बाबाराव मुसळे यांची हल्या हाल्या दुधू दे , वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळया यासारख्या कादंबऱ्यातून प्रत्यक्षात काय चालले आहे. त्याचे चित्रण यायला लागले. ग्रामीण भागात विकास तर झाला नाहीच, शेतकऱ्यांच्या आत्महत्या मात्र घडायला लागल्या. त्यांचे चित्रण साहित्यातून यायला लागले. सदानंद देशमुखांच्या बारोमास मधून राजन गवस तणकट मधून ग्रामीण तरूण मनाच्या व्यथा मांडल्या आणि सवर्ण–दलित संघर्ष मांडला आहे.

ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केले त्याचबरोबर त्यांनी ग्रामीण जीवनाच्या अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण साहीत्य चळवळीचा परिणाम या चळवळीपासून दूर असलेल्या लेखकावरही झालेला दिसतो. आज लिहिणारे ग्रामीण लेखक समाजाच्या वेगवेगळया स्तरातून झालेले दिसतात. भास्कर चंदशिव, वासुदेव मुलान्हे, इंद्रजित भालेवार, श्रीकांत देशमुख, विठ्ठल वाघ, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, रविंद्र शोभणे, शेषराव मोहिते, तानाजीराव पाटील असे कितीतरी ग्रामीण लेखक व कवी आज ग्रामीण वास्तव जीवनखित्रण करतांना दिसतात. ग्रामीण साहित्य चळवळीमुळेच ग्रामीण साहीत्य कादंबरी, कथा, कविता आदी साहित्य प्रकारव्दारे अधिक वस्तुस्थितीपूर्ण चित्रण करू लागले आहे. ग्रामीण साहीत्य चळवळीचा परिणाम आहे.

**समारोपः**– एकुणच ग्रामीण साहीत्य 1960–65 काळात ग्रामीण साहीत्य विशेष लोकत्रीय झाले. या काळात कथा–कांदबऱ्यांची निर्मिती जोमाने झालेली दिसते हा काळ नवसाहित्याच्या बहराचा काळ होता. त्यामुळे नवसाहित्याच्या नव्या प्रेरणा प्रवृत्तीच्या संगतीने ग्रामीण साहीत्याचे स्वरूप बदलून टाकते. 1975 च्या आसपास ग्रामीण साहित्यात एक चमत्कारीक आर्वतन निर्माण झाले. ग्रामीण साहित्याचे आजचे स्वरूप हे कालच्या ग्रामीण साहित्यापेक्षा निश्चितच वेगळे आहे. या वेगळेपणात बदलती सामाजिक

परिस्थिती वाढते. दारिद्रय आणि प्रत्येकाला जाणवत जाणारे आत्मभान महत्वाचे आहे. 1970 नंतरच्या ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण नवलेखकाला अंतर्मुख बनविले. या चळवळीमूळे कथा, कादंबरी, कविता, नाटक ललित गद्य, समीक्षा, अशा साहित्य प्रकारात लेखन करण्यास लेखकाला प्रवृत्त केले.

**संदर्भ ग्रंथ**


1. डॉ. श्रीराम गुंदेकर – ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन
2. डॉ. राहुल रजनी – यांच्या ग्रामीण साहित्य : संकल्पना व मराठीतील परंपरा
3. रामचंद्र काळुंखे – ग्रामीण वाङमयाचा इतिहास
4. डॉ. सविता पवार – ग्रामीण साहित्य चळवळ व ग्रामीण साहित्यः एक अभ्यास

# INDEX

01) इ.स. १९६० नंतरची ग्रामीण कविता व सद्यस्थिती
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सातारा ||14

02) साठोत्तरी दलित कादंबरीचे स्वरूप
प्रा. डॉ. बाळासाहेब शेळके, जि. अहमदनगर ||19

03) १९८० नंतरची मराठी आदिवासी कादंबरी : एक दृष्टिक्षेप
डॉ.पांडुरंग भोसले & डॉ.सचिन सि.रुपनर, पुणे ||27

04) १९८० नंतरच्या स्त्रियांच्या कवितेचे समाजशास्त्रीय मूल्यमापन
डॉ. हरेश संपत शेळके, पारनेर ||36

05) मराठीतील १९६० नंतरचे नाट्यप्रवाह, स्थित्यंतरे व सद्यःस्थिती
डॉ. वर्षा दिगंबर गायकवाड, नागपूर ||41

06) स्त्रीवाद : संकल्पना व स्वरूप
डॉ. प्रमोद भीमराव गारोडे, जि अमरावती ||48

07) मराठी ग्रामीण साहित्य प्रवाह व सद्यस्थिती
प्रा.पवार राजकुमार श्रीधर, मंगळवेढा ||52

08) ग्रामीण साहित्य प्रवाह
डॉ. प्रीती किशोर उमाठे, नागपुर ||55

09) मराठीतील १९६० नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्यस्थिती — दलित साहित्य
प्रा. नाना त्र्यंबक घुगे, नाशिक ||59

10) मराठीतील १९६० नंतरचा कथा वाङ्मय प्रवाह व सद्यस्थिती
प्रा.माधुरी हरिभाऊ गवळी, नाशिक ||63

11) ऐसे कुणबी भूपाळ अमिनदारांच्या कौटुंबिक समर्पणाची गाथा!
प्रा. डॉ. सूर्यकांत अ. आजगांवकर, माटुंगा ||72

12) मराठी लोकवाङ्मयातील तमाशाची सद्य स्थिती
प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यरावते, जि.परभणी ||77



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

9:55

Back Special_Issue_Joshi_College_Se...

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | Oct. To Dec., 2021 Special Issue | 01





रयत शिक्षण संस्थेचे,

एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८.

नॅक-ए ग्रेड, संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

रयत शिक्षण संस्थेचे,

एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८.

मराठी विभाग आयोजित

आंतरराष्ट्रीय वेबिनार

# विषय:मराठीतील १९६०नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्य:स्थिती

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे

**प्रमुख संपादक**

प्रा.डॉ.राजेंद्र ठाकरे

प्रा.डॉ.अतुल चौरे

**सहाय्यक संपादक**

प्रा.डॉ.नम्रता मेस्त्री

प्रा.डॉ.संदीप वाकडे

शनिवार दि.११ सप्टेंबर २०२१

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मताशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At Post Limbaganesh Tq Dist Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell 07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com



Date of Publication
01 October 2021

Date of Publication
01 October 2021

Vidyawarta™
International Multilingual Research Journal

विद्यावार्ता
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyawarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT 7.940 IIJIF FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com